# फौजदारी कायदा सुधार समितीला विरोध करा

## आत्ता नाही! याप्रकारे नाही !! आम्हा सर्वांशिवाय नाही !

संपूर्ण देशाला कोरोना महामारीने हादरून सोडले असतानाच या रोगामुळे ४० हजाराहून अधिक मृत्यूंची अधिकृतपणे नोंद झाली आहे. ह्या दरम्यान केंद्रीय गृह मंत्रालयाने ४ मे २०२० रोजी भारतीय घटनेअंतर्गत ३ सर्वांत महत्वाचे कायदे म्हणजेच भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय साक्षीपुरावा अधिनियम बदलण्यासाठी ५ सदस्यीय समिती स्थापन केली. ह्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया उघड, सर्वसमावेशक आणि पारदर्शक असण्याऐवजी ही गुप्त, गैर समावेशी आणि अपारदर्शक आहे. या देशाचे नागरिक या नात्याने सुधारणेच्या नावाखाली हे कायदे एकतर्फी बदलण्याच्या या प्रयत्नास आपण विरोध केलाच पाहिजे.

- **फौजदारी कायद्याची सुधार समिती प्रातिनिधिक स्वरुपाची असणे आवश्यक आहे** - सध्याच्या समितीत **दिल्ली आणि मुंबई येथील 5 पुरुष आहेत** - ना महिला, ना दलित, ना आदिवासी, ना ट्रान्स समुदायामधील व्यक्ती, ना भटक्या विमुक्त जमातीच्या व्यक्ती, ना अपंग आणि ना धार्मिक अल्पसंख्याक व्यक्ती! पोलिसांची निर्दयी अरेरावी, भ्रष्टाचार आणि क्रूरपणा ह्या सगळ्याचा बोजवारा सहन करणाऱ्या सर्वांना वगळणारी अशी समिती गुन्हेगारी कायद्यात "सुधारणा" कशी आणू शकते?

- **कोरोनाच्या नावाखाली महत्त्वपूर्ण कायदे बदलू शकत नाहीत** - केंद्रीय गृह मंत्रालयाने ही अधिसूचना कोरोनामुळे चालू असणाऱ्या देशव्यापी लॉकडाऊनमध्ये का दिली? या मूलभूत कायद्यांमधील महत्त्वपूर्ण बदलांचा विचार अशावेळी का केला जात आहे, जेव्हा न्यायालयाचे कामकाज जेमतेम चालू आहे , सार्वजनिक सभा घेण्यास परवानगी नाही , नागरिक तसेच वकिलांना उपजीविकेसाठी अभूतपूर्व आव्हानांचा सामना करावा लागत आहे, बार असोसिएशनचे काम देखील बंद पडले आहे आणि भारताची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था प्रचंड तणावात आहे.

- **फौजदारी कायद्यांचा काळजीपूर्वक विचार करण्यासाठी पुरेसा कालावधी आवश्यक आहे** - केवळ ६ महिन्यांत भारतीय राज्यघटनेअंतर्गत तीन सर्वात महत्वाचे कायदे जे १५० वर्षांच्या प्रस्थापित न्यायशास्त्रावर आधारीत आहेत ते दुरुस्त करण्याचे काम या समितीवर सोपवले आहे. कोविड नसलेल्या काळातही हे कोणत्याही अस्सल सल्लामसलतीसाठी घाईचे आणि अशक्य आहे. कोरोना दरम्यान अशा निश्चित केलेल्या अवधीमुळे ही प्रक्रिया केवळ एक धूळफेक आहे आणि अहवालाचे निष्कर्ष यापूर्वीच ठरवले गेले आहेत, ही चिंतेची बाब आहे.

- **सार्वजनिक सल्लामसलत व्यवस्थित जाहिरात केलेली, सर्वसमावेशक आणि पारदर्शक असावी -** समितीची सार्वजनिक सल्लामसलत प्रक्रिया सार्वजनिक किंवा सल्लामसलत स्वरूपाची देखील नाही. दिल्लीतील निवडक वकीलांनाच ऑनलाइन सल्लामसलतीच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी या समितीने आमंत्रित केले आहे. इतर "तज्ञ" तांत्रिकदृष्ट्या स्वत: च्या पुढाकाराने सहभागी होऊ शकतात, परंतु या प्रक्रियेबद्दल जनतेला मोठ्या प्रमाणात माहिती देण्याचा आणि व्यापक सहभाग मिळवण्याचा समितीकडून कोणताही प्रयत्न केला गेलेला नाही. सर्व सूचना, प्रश्नावली आणि सहभागासाठी आमंत्रणे केवळ इंग्रजीभाषेतच जारी

केल्या आहेत! या समितीच्या संदर्भ अटी लपविल्या गेल्या आहेत आणि अद्याप त्या सार्वजनिक केल्या गेलेल्या नाहीत. ज्या प्रश्नावलींवर सल्लामसलत करायची आहे, त्याचा प्रतिसाद सादर करण्यासाठी ठरवलेल्या अंतिम मुदतीच्या केवळ २८ दिवस आधी त्या प्रश्नावली जाहीर केल्या गेल्या आहेत आणि प्रतिसाद फक्त ऑनलाइन नोंदणीनंतरच पाठविला जाऊ शकतो.

- **कायद्याची सुधारणा ही विश्वसनीय माहिती आणि स्पष्ट उद्दीष्टांवर आधारित असावी -** कायद्यात कोणतीही सुधारणा करण्याआधी पोझिशन पेपरच्या मालिकेनंतर, सार्वजनिक सल्लामसलत आणि भागधारकांसह कार्यशाळा झाल्या पाहिजेत. पूर्वी कायदा आयोग आणि इतर स्वायत्त आयोगांनी कायद्यांमध्ये बदल करण्याची शिफारस करण्यासाठी असे व्यापक कार्य केले आहे. ती प्रक्रिया आता का सोडून दिली गेली आहे?

## फौजदारी कायद्याचा परिणाम संपूर्ण देशाच्या प्रत्येक नागरिकांवर होणार आहे! कोणत्याही सुधार प्रक्रियेत आमचे मत ग्राहय धरणे अनिवार्य आहे!

## शाम समितीला विरोध करा, अस्सल सार्वजनिक सल्लामसलतीची मागणी करा.

*जनहितार्थ: फौजदारी कायद्या सुधार समिती विरुद्ध नागरिक*